महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

शिकून सारेजण करू द्विजगण रक्षण !

# पक्षिमित्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

संपादक : दिगंबर गाडगीळ

- वर्ष – चौदावे
- अंक ३ रा
- १ एप्रिल २०२४
- पाने – २४



कन्हैया उदापुरे

# सारस पक्षिमित्र संमेलनाची क्षणचित्रे



गोंदिया येथे पार पडलेल्या सारस संमेलनात, सारस माहिती पत्रकाचे प्रकाशन करताना जिल्हाधिकारी मा.चिन्मय गोतमारे, DFO श्री. तुषार ढमढेरे, म.प.चे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर, सेवा संस्थेचे श्री. सावन बहेकार व श्री. संजय आकरे आदी मान्यवर



गोंदिया येथे पार पडलेल्या सारस मित्र संमेलनात पक्षिमित्र (जानेवारी २०२४) या अंकाचे प्रकाशन करतांना श्री. अनिल पाटील, श्री. तुषार ढमढेरे, डॉ. जयंत वडतकर, सेवा संस्थेचे श्री. सावन बहेकार व श्री. संजय आकरे



सारस संवर्धनासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सारस मित्रांचा सन्मान जिल्हाधिकारी मा.चिन्मय गोतमारे यांचे हस्ते प्रमाणपत्र व आवश्यक साहित्याची कीट देऊन करण्यात आला



सारस मित्र संमेलनाचे प्रास्ताविक व सारस संवर्धनाबाबत माहिती देताना सेवा संस्थेचे श्री. सावन बहेकार



सारस मित्र संमेलनासाठी उपस्थित मान्यवर, ग्रामस्थ तथा सेवा संस्थेचे कार्यकर्ते



सारस मित्र संमेलनास सारस पक्षिअभ्यासकांनी आपली हजेरी लावली होती यामध्ये भंडारा येथील श्री. राजकमल जोब, श्री. शहीद खान, गोंदिया येथील श्री. मुकुंद धुर्वे, श्री. भारतभाई जसानी, श्री. संजय आकरे, श्री. अशोक पडोळे, म.प.चे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर व सेवा संस्थेचे श्री. सावन बहेकार

## संपादक

**श्री. दिगंबर गाडगीळ**
C/o यशवंत पटवर्धन ४४/३० रूबी । शिवदर्शन पर्वती, ।
शतायू भवन शेजारी राज अपार्टमेंट, पुणे ९
चलभाष : ९८८१०७९७११

## सहाय्यक संपादक

**श्री. किरण मोरे**,अमरावती, मो. ९९२३९१००३४
Email: kiranmorey1983@gmail.com

## कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | **डॉ. जयंत वडतकर**, अमरावती<br>मो. ९८२२८७५७७३ |
| कार्याध्यक्ष | – | **डॉ. राजू कसंबे**, ठाणे<br>मो. ९००४९२४७३१ |
| संघटक | – | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**, अहमदनगर<br>मो. ९८५०२९१३२४ |
| कार्यवाह | – | **प्रा. डॉ. गजानन वाघ**, अमरावती<br>मो. ९८२२२०४०७० |
| सहकार्यवाह | – | **श्री. शरद आपटे**, सांगली<br>मो. ९८९०३८४४०० |
| सहसंघटक | – | **डॉ. अनिल माळी**, नाशिक<br>मो. ९८५०८१८६४४ |
| सदस्य | – | **प्रा. डॉ. निनाद शाह**, सोलापूर<br>मो. ९४२२४५९९१५ |
| सदस्य | – | **श्री. किशोर गठडी**, औरंगाबाद<br>मो. ९४२२२०२६२८ |
| सदस्य | – | **श्री. दिलीप विरखडे**,वर्धा<br>मो. ७७७५८८३८६१ |
| सदस्य | – | **श्री. अविनाश कुबल**,ठाणे<br>मो. ९३२४२३८०३१ |
| सदस्य | – | **कु. रूपाली मढवी**,मुंबई<br>मो. ९८६९५५९९२२ |

## सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊ काटदरे | (चिपळूण) | मो. ९४२३८३१७०० |
| श्री. दिगंबर गाडगीळ | (पुणे) | मो. ९८८१०७९७११ |
| डॉ. दिलीप यार्दी | (औरंगाबाद) | मो. ९४२२७०४२२१ |
| डॉ. अनिल पिंपळापुरे | (नागपुर) | मो. ९८८१७१३४६६ |
| श्री. बापुसाहेब भोसले | (अहमदनगर) | मो.९८२२६३३१३३ |


# संपादकीय

## पवित्र मतदान




**दिगंबर गाडगीळ**
संपादक, महाराष्ट्र पक्षीमित्र अंक
dgadgil09@gmail.com


अपेक्षेप्रमाणे देशभर निवडणूक संहिता जारी झाली. आजच्या सारख्या सामान्य मतदाराच्या दृष्टीने ती चांगली गोष्ट आहे. आता कोणी जबरदस्ती करणार नाही की, धाकटदशा दाखवणार नाही पण मतदान करण्याचे आवाहन मात्र करतील.

चांगल्या कामाचे श्रेय घेऊ पाहणारा पक्ष असो की देशभर यात्रा करणारा पक्ष असो किंवा प्रादेशीक पक्ष असो हवे त्याला मतदान करा. मात्र मतदान करण्याच्या पवित्र कार्याला चुकू नका. आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मत देण्याची हयगय करू नका तो दिवस सुट्टी म्हणून घालवा पण मत दिल्यानंतर.

आपण सर्व पक्षीप्रेमी म्हणजे निसर्गप्रेमी आहात तेव्हा निसर्ग संवर्धनाला महत्व देणाऱ्या उमेदवाराला मत द्या मग तो कोणत्याही पक्षाचा असो कारण पर्यावरण रक्षण हा सध्या कळीचा मुद्दा झालेला आहे

मग मतदानाच्या दिवशी मत द्याल ना. !





मुखपृष्ठ :– Sarus Crane सारस – छायाचित्रकार– कन्हैया उदापूरे, गोंदिया

## ✻ अध्यक्षीय ✻



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

भारतातील पक्ष्यांची सध्यस्थिती विषद करणारा स्टेट ऑफ इंडिअन बर्डस २०२३ (SoIB) चा अहवाल मागील वर्षी प्रकाशित करण्यात आला होता. एसओआयबी च्या या अहवालात ३० हजार पेक्षा जास्त पक्षी निरीक्षकांच्या ३० दशलक्ष नोंदी व निरीक्षणे पडताळण्यात आली. यावरून सिटीझन सायन्स अर्थात लोकविज्ञानाचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. या अहवालानुसार भारतातील २१७ पक्ष्यांच्या प्रजातीची संख्या ही गेल्या आठ वर्षापासून स्थिर दिसत असून १७८ प्रजातींच्या संवर्धनाकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे असल्याचे दिसून आले आहे. खूप साऱ्या प्रजातींची संख्या झपाट्याने कमी होत असून ही जगभरातील पक्षी अभ्यासकांसाठी आणि एकूणच पर्यावरणासाठी धोक्याची घंटा आहे. या अहवालानुसार काही पक्ष्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे सुद्धा दिसून आले आहे. यामध्ये, कबूतर, मोर, वटवट्या व कोयल आदी पक्ष्यांचा समावेश आहे. ठराविक पक्षी वाढताना दिसत असले तरी ती सुद्धा धोक्याचीच घंटा आहे. शहरातील किंवा जंगलातील कबूतर व मोर यासारख्या पक्ष्यांची संख्या वाढणे म्हणजे तेथील इतर स्थानिक प्रजातींवर त्याचा विपरीत परिणाम होऊन अनेक प्रजाती त्या प्रदेशातून नष्ट किंवा कमी होत आहेत हे स्पष्ट आहे. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी समतोल राखणे ही खरी तारेवरील कसरत आहे. गेल्या जानेवारी महिन्यात मकर संक्रांतीच्या महाराष्ट्रात किंवा एकूणच संपूर्ण देशात नायलॉन मांजाने कहर केल्याचे वृत्तपत्रातील बातम्यांतून उघडकीस आले होते. या मांजाच्या वापराने शहरात अनेकांचे गळे चिरले, अनेक जण मृत्युमुखी पडले. अनेक ठिकाणांहून समाज माध्यमांवर आलेले फोटो आणि व्हिडिओतील दृश्य विदारक असे होते. नायलॉन मांजा हा पक्ष्यांसोबतच मानवासाठी सुद्धा घातक आहे. यावर्षी मांजामुळे पक्ष्यांची सुद्धा मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली आहे. मांजाचे दुष्परिणाम माहिती असूनही त्याचा सर्रास वापर होत आहे. त्याचा खुलेआम व्यापार होतो, वापरणाऱ्या आणि विकणाऱ्या लोकांना त्याचे काहीही वाटत नाही. लोक इतके असंवेदनशील कसे काय असू शकतात ? असा प्रश्न पडतो. हा मांजा धोकादायक आहे म्हणून त्याच्या वापरावर बंदी घालण्यासाठी राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने २०१५ मधे एक परिपत्रक काढले होते, मात्र त्यास कायदेशीर आधार नसल्याने त्याचा काहीही परिणाम झाला नव्हता. त्यानंतर अनेक वर्षापासून सुरु असलेल्या हरित लवादासमोरील खटल्याचा २०१७ साली निकाल लागला. हरित लवाद (National Green Tribunal) कडून दि. 11 July 2017 ला दिलेल्या महत्वपूर्ण आदेशानुसार नायलॉन/चायनीज मांजाच्या व्यापार, साठवणूक, विक्री व वापरावर सरसकट बंदी घालण्यात आली. यामधे विविध कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे सुद्धा प्रावधान करण्यात आले आहे. ही कारवाही करण्यासाठी सदर आदेशामध्ये Environment (Protection) Act 1986; Prevention of Cruelty of Animal Act 1960; Wildlife (Protection) Act 1972; Indian Pinal Code ई कायद्या अंतर्गत कारवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. याबाबत शासकीय यंत्रणा व नागरिकांमधे जनजागृती होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र पक्षीमित्र तर्फे याबाबत सातत्याने प्रयत्न केले जात असून यावर्षी आपल्या अनेक सभासदांनी आपापल्या शहरात जनजागृती आणि शासनास निवेदन देऊन प्रशासनास या कामी अनेक ठिकाणी सहकार्य केले आहे. त्याचा सकारात्मक परिणाम सुद्धा दिसून आला आहे. अनेक शहरात आणि लहान लहान गावात सुद्धा पोलीस प्रशासन आणि वन विभाग यांचे कडून यावर्षी मोठ्या प्रमाणात धाडसत्र राबविले गेले. मोठ्या प्रमाणात मांजा जप्त केला गेला. अनेकांना अटक सुद्धा झाली व खटले भरल्या गेलेत. त्यामुळे पुढील वर्षी याचा कमी प्रमाणात वापर होईल अशी आशा करू या. मात्र पुढील वर्षी सुद्धा महाराष्ट्र पक्षीमित्र कडून याबाबत निवेदने देणे आणि जनजागृती करणे असे उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविले जातीलच. महाराष्ट्रातून सध्या संपण्याचा ज्वलंत धोका असणाऱ्या पक्ष्यांच्या यादीत अनेक पक्षी आहेत, त्यामध्ये

दरवर्षी नवीन प्रजातींची भर पडत आहे हे आणखी चिंतनीय आहे. महाराष्ट्रातील माळढोक पक्ष्यांची संख्या अवघी दोन इतकी उरली असून त्यातील एक मादी पक्षी सोलापुरात तर दुसरा नर पक्षी चंद्रपूर जवळील वरोरा मध्ये आहे. याचाच अर्थ यांची संख्या वाढण्याची कुठलीही शक्यता उरलेली नाही. काहीतरी चमत्कार होऊन, बंदिस्त प्रजननाचे नवीन काहीतरी प्रयोग केले जातील एवढी एकच धूसर शक्यता आहे. तनमोर हा माळरानातील दुसरा संकटग्रस्त पक्षी. हा सुद्धा या संकटग्रस्त अधिवासात किती दिवस आपले अस्तित्व टिकवून ठेवू शकेल हे येणारा काळच ठरवेल. मोठ्या आकाराच्या आणि जमिनीवर अंडी घालणाऱ्या पक्ष्यांपैकी आणखी महत्वाची प्रजाती म्हणजे सारस. महाराष्ट्रात सारस दिसायचा तो फक्त महाराष्ट्राच्या अति पूर्वेकडील चंद्रपूर, गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात. भातशेती आणि तलावांचे जिल्हे म्हणून प्रसिद्ध असलेल्या या भागात हे पक्षी पूर्वी सामान्यपणे दिसायचे. अलीकडे निवृत्तीकडे चाललेल्या पिढीने या पक्ष्यांना त्यांच्या लहानपणी अगदी गावाजवळ, शाळेजवळ किंवा शेतात सहजपणे बघितले आहे. आज मात्र हे पक्षी जेमतेम बोटावर मोजण्या इतके उरले आहेत. सारस पक्षी आणि त्यांची सध्यस्थिती हा विषय २००८ ते २०१३ दरम्यान जेव्हा गोंदिया येथील पक्षिमित्र श्री. मुकुंद धुर्वे, संजय आकरे, स्व. ईश्वरदयाल गौतम यांनी विदर्भ पक्षिमित्र व राज्य पक्षिमित्र संमेलनाच्या व्यासपीठावरून मांडला तेव्हा त्याची परिस्थिती राज्यातील इतर पक्षिमित्रांना समजली. त्यानंतर महाराष्ट्र पक्षीमित्र कडून सारस संवर्धन निधी सुद्धा गोळा केला गेला. पुढे स्थानिक अभ्यासकांनी संवर्धनासाठी अनेक स्तरातून प्रयत्न केले. या मोहिमेत अनेक जण सहभागी झाले. पुढे गोंदिया येथे सेवा (SEWA) संस्था स्थापन झाली, नवीन फळी जोमाने कार्य करू लागली. सेवा संस्थेचे श्री. सावन बाहेकर यांच्या मार्फत हा प्रश्न वन विभाग, जिल्हा प्रशासन मार्फत शासनापर्यंत पोहोचला. शासकीय यंत्रणांचा व स्थानिकांचा सहभाग वाढला, जनजागृती झाली. शिकार, अंडी चोरणे, घरटे तोडून टाकणे असे प्रकार  सुद्धा कमी झालेत. मात्र पूर्वी यांची संख्या ५०-६० इतकी होती, ८ ते १० ठिकाणी त्यांची घरटी व्हायची ही संख्या दरवर्षी कमी होत आहे ही सर्वात चिंतनीय बाब आहे. गोंदिया येथील सेवा ही संस्था भंडारा व गोंदिया जिल्ह्यात तसेच लगतच्या मध्यप्रदेश मधील बालाघाट जिल्ह्यात सुद्धा सारस संवर्धनासाठी कार्य करीत आहे. सुमारे ३०-४० ग्रामपंचायत मधील शेकडो तरुणांना सारस मित्र बनविले. त्यांच्या मार्फत सारस संवर्धनाचे कार्य जोमाने होत आहे. यामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने सेवा संस्थेचे श्री. सावन बहेकार हे दरवर्षी सारस मित्र संमेलनाचे आयोजन करीत असतात. गेल्या जानेवारी महिन्यात गोंदिया येथे हे संमेलन पार पडले. यामध्ये सेवा संस्थेच्या कार्यकर्त्यांसोबत गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील सारस अभ्यासक मानद वन्यजीव रक्षक अशा अनेकांनी हजेरी लावली. यामध्ये भंडारा येथील श्री. राजकमल जोब, श्री. शहीद खान, गोंदिया येथील श्री. मुकुंद धुर्वे, श्री. भारतभाई जसानी, श्री. संजय आकरे, श्री. अशोक पडोळे यांची विशेष उपस्थिती होती. महाराष्ट्र पक्षीमित्र अध्यक्ष या नात्याने मला सुद्धा या संमेलनात बोलावण्यात आले होते. विशेष म्हणजे या संमेलनात गोंदियाचे जिल्हाधिकारी मा.चिन्मय गोतमारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल पाटील, विभागीय वनाधिकारी श्री. तुषार ढमढेरे तसेच अनेक वन अधिकारी व कर्मचारी यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी ०३ उत्कृष्ट वनरक्षक, ०३ उत्कृष्ट ग्रामपंचायत व सुमारे ३०-३५ उत्कृष्ट सारस मित्रांना, आवश्यक वस्तू व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. शासकीय विभाग, अशासकीय संस्था यांनी संवर्धनाचे कार्य करीत असताना स्थानिकांचा जो सहभाग यामध्ये वाढविला आहे, त्यामुळे सारस बद्दल अधिकृत माहिती गोळा करून त्यांचे संवर्धनासाठी प्रयत्न करणे शक्य होणार आहे. महाराष्ट्रात जेमतेम ३० च्या संख्येत उरलेल्या सारस या राजबिंडा पक्ष्याचे महाराष्ट्राच्या नकाश्यावर अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल तर स्थानिक लोक व संस्थाच ते कार्य करू शकणार आहे. त्यांना पाठबळ देणे आणि शुभेच्छा देणे एवढेच आपल्या हाती आहे. मिळून सारे जन । करू व्दिजगना रक्षण ।।

****

# सारस सेवा



**सावन बहेकार**
गोंदिया
९४२०५१५०४१

महाराष्ट्र राज्याच्या शेवटच्या टोकावर वसलेला तलावांचा जिल्हा गोंदिया जैवविविधतेने आणि वन्यजीव सृष्टीने नटलेला आहे. राज्याच्या पूर्वेकडे वसलेल्या गोंदिया जिल्हात जगातील आकाराने सर्वात मोठ्या उडणाऱ्या पक्ष्याचा अधिवास आहे. महाराष्ट्रामध्ये सारस पक्ष्यांचा अधिवास हा आता केवळ गोंदिया जिल्ह्यापुरताच शिल्लक राहिला आहे. त्यातील सीमावर्ती भागात असलेल्या या जिल्हातील धानाच्या शेतात आणि काही मोजक्याच पाणथळ क्षेत्रात हे पक्षी आश्रयाला आहे. भारतातील या पक्ष्याचा अधिवासाच्या विस्ताराची दक्षिणेकडील सीमा ही गोंदिया जिल्ह्यपर्यंतच आहे. म्हणजेच त्या खालील भूप्रदेशात हा पक्षी आढळत नाही. क्रेन पक्ष्यांच्या कुळातील सर्वात मोठी असलेली हि प्रजाती सुमारे ६ फूट उंच असते. सारस पक्षी हा पाणथळ अधिवास क्षेत्रात आढळणारा पक्षी आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये सारस पक्ष्याला मानाचे स्थान आहे. असे मानले जाते की वाल्मिकी ऋषींना सारस पक्ष्याच्या जोडीला पाहून पहिले काव्य सुचले व रामायणाची निर्मिती झाली. हे पक्षी आयुष्यभर एकाच जोडीदारासोबत व्यतीत करीत असतो.त्यामुळे या पक्ष्याला प्रेमाचे प्रतिक मानतात. महाराष्ट्रामधील एका जिल्हयापूरते शिल्लक राहिलेलं अधिवास क्षेत्र हि चिंतेची बाब आहे. अश्या परिस्थितीत या पक्ष्याच्या संवर्धनासाठी सेवा संस्थेने सन २००४ पासून लोकसहभागातून गोंदिया जिल्ह्या सोबतच सीमावर्ती राज्याच्या बालाघाट जिल्हामध्ये सारस संवर्धनाचे कार्य सुरू केले. पक्ष्यांची नेमकी संख्या जाणून घेण्यासाठी सारस पक्षी गणनेला सुरुवात केली. या गणनेच्या माध्यमातून २००४ साली गोंदिया जिल्हात केवळ ४ ते ६ सारस पक्ष्याचा अधिवास असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर सेवा संस्थेने सातत्यपूर्ण सारस पक्ष्याच्या अधिवास असलेल्या क्षेत्रात जनजागृती केली व ज्या शेतकऱ्यांच्या शेतात घरटी व्हायची त्यांची समज काढण्यात आली. सारस पक्ष्यांची घरटी शोधून त्यावर सनियंत्रण ठेवण्यात आले.सारस पक्ष्यांचे भ्रमण क्षेत्राचे सर्वे करून त्यांच्या विश्रांती स्थळाचे शोध घेतले जेणेकरून गणना अचूक व प्रभावी व्हावी. सेवा संस्थेने सातत्यपूर्ण केलेल्या सारस संरक्षणाच्या कार्यामुळे २०२० सालापर्यंत ही संख्या ५० वर गेली. मात्र २०२३ साली ही संख्या घसरून ३१ झाली. वर्तमानपत्रात सेवा संस्थेच्या कार्याची दखल प्रकाशित झाल्यावर माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठने २०२१ साली सु-मोटो याचिका दाखल करून घेतली व सर्व विभागाला एकत्र आणून सारस संरक्षण समितीची स्थापना करून राज्य सरकारला सारस पक्षी संरक्षण व संवर्धनाचा आराखडा सादर करण्याचे आदेश देण्यात आले. सेवा ३९; सारस स्केपसाठी दीर्घकालीन व्यवस्थापन योजना विकसित करण्यास उत्सुक आहे, ज्यामध्ये कृषी पद्धती, पाणथळ अधिवासाचे पुनरुज्जीवन, प्रजाती आदींचा पद्धतशीर अभ्यास केला जाईल. अधिवास व्यवस्थापनासाठी स्थानिक लोकांना सोबत घेऊन हे करण्यात येईल. पूर्वी ज्या ठिकाणी सारस क्रेनचे अस्तित्व नोंदवले गेले होते आणि त्यात या प्रजातींच्या विकासाला वाव आहे, अशा भागांचे पुनरूज्जीवन करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. नवीन शोधलेल्या घरट्यांच्या ठिकाणी आवश्यक संरक्षण प्रदान करण्याचे आमचे ध्येय आहे. सारस संवर्धनाकरिता २००४ मध्ये गोंदिया जिल्ह्यातून



स्थानिक स्वयंसेवींनी 'सेवा' (Sustaining Environment amp;Wildlife -Assemblage) च्या माध्यमातून सुरूवात केली. 'सेवा' गोंदिया, भंडारा (महाराष्ट्र) आणि बालाघाट (मध्यप्रदेश) येथील वन्यजीवांचे कायमस्वरूपी संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी दशकाहून अधिक काळ काम करत आहे. 'सेवा' च्या प्रयत्नांचा विशेषतः जगातील सर्वात उंच उडणाऱ्या पक्ष्याच्या संवर्धनासाठी अनेक राष्ट्रीय मंचावर सखोलपणे स्वीकार करण्यात आला आहे. वर्षानुवर्षे, आम्ही स्थानिक स्वयंसेवक आणि शेतकऱ्यांचे नेटवर्क तयार करण्यात सक्षम झालो आहोत आणि त्यांच्यात त्या प्रजातींचे महत्त्व आणि आमच्या जैवविधतेतील प्रत्येक घटकाची भूमिका याविषयी संवेदनशीलता निर्माण केली आहे. सारस पक्ष्याच्या संवर्धनामध्ये या नेटवर्कने खरोखरच अपेक्षित (जे आकडेवारीवरून स्पष्ट होते) परिणाम दिले आहेत.

टिम सेवा : अध्यक्ष सावन बहेकार, चेतन जसानी, शशांक लाडेकर, अविजित परिहार, अंकित ठाकुर, कन्हैया उदापुरे, दुष्यंत आकरे, सुशील बहेकार, डीलेश कुसराम, गौरव मटाले, प्रतिक लाडेकर.



*****

## आपल्या माहितीला उजाळा - भाग ११

| अ.क्र. | प्रश्न | थोडी मदत |
|---|---|---|
| १. | बगळे कोणत्या पक्षी कुटुंबाचे सदस्य आहेत? | ही एक बहू प्रजाती कुटुंब आहे. |
| २. | पाळीव पशुधनासोबत हा बगळा आपल्याला नेहमी दिसतो. | याचे नावही पाळीव प्राण्यावरून ठेवण्यात आले आहे. |
| ३. | गटात न बसणारा पक्षी ओळखा.<br>Dupetorflavicollis काळा तापस<br>Ciconia Ciconia पांढरा करकोचा<br>ArdeaPurpurea जांभळा बगळा<br>Nycticoraxnycticorax रात धोकरी | पक्षी कुटुंबाची वर्गवारी आपल्याला वेगळा पक्षी ओळखायला मदत करते. |
| ४. | महाराष्ट्रात बगळ्याच्या किती प्रजाती नोंदविल्या आहेत? | केवळ Ardeidae कुटुंबातील प्रजाती मोजा. |
| ५. | बगळा हे_ या विद्यापीठाचे चिन्ह आहे. | हे विद्यापीठ केंब्रिज शहरात आहे. |
| ६. | Egrettagularis याचे मराठी नाव काय? | इंग्रजी नाव Western Reef-heron |
| ७. | Ardeidae कुटुंबात असणारा भारतातील सर्वात मोठा बगळा कोणता? | शास्त्रीय नाव Egretta alba |
| ८. | कोणत्या संस्थेचे चिन्ह बगळा आहे? | ही पक्षी संवर्धनास वाहिलेली संस्था आहे. |
| ९ | बगळ्याचे नाव असणारी, सौदर्य प्रसाधने बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीचे नाव काय ? | ही कंपनी अमेरिकेत स्थित आहे. |
| १०. | चित्रातील पक्षी शास्त्रज्ञ ओळखा.  | हे IUCN मधील बगळा पक्षीतज्ञ समितीचे विद्यमान अध्यक्ष आहेत.<br>**राघवेंद्र वंजारी** |

# पक्ष्यांच्या बाळंतपणाची गोष्ट



**माणिक पुरी**
परभणी
मो.९८८१९६७३४६

आज आजीला जाऊन तेरा वर्षे पूर्ण झाली. पण ती अजूनही जशीच्या तशी अनेक वेळा पुढ्यात येते. बोलत मात्र काहीच नाही. तिचं असं अचानक येणं आणि निघून जाणं आजही सुरूच आहे. काळाआड गेलेल्या घरातल्या व्यक्तिला पुढचा जन्म कोणाचा मिळेल हे पाहण्यासाठी मूठभर राख आणून घरात पसरून ठेवली जाते. त्यावर एखादं ताट झाकून ठेवतात. पहाटे झाकलेलं ताट बाजूला करून त्यावर उमटलेले ठसे न्याहाळायचे. आकार पाहून अंदाज बांधायचा. पायाची – हाताची बोटं पाहून भविष्य वर्तविलं जात असे. पण हे सगळं कानोकान ऐकलेलं होतं. प्रत्यक्षात कोणाच्याही घरात जाऊन पाहता आलं नाही की, कोणाला मूठभर राख आणताना पाहिलं सुद्धा नाही. तरीपण तेरा वर्षांपूर्वी मी ते धाडस केलं होतं. तिला जिथं समाधीस्थ बसविलं होतं तिथं उंचवटा करून हातानं माती पसरवली होती. तीच मूठभर माती घरात आणून झाकून ठेवली. सगळ्यांची नजर चुकवून पहाटे ती माती न्याहाळली. त्या मातीवर पक्ष्याच्या पायाची नक्षी उमटलेली दिसली. तेव्हा मी मनाशीच म्हणालो की, तिनं पाखराच्या कुळात जन्म घेतलाय. खरंच ती पाखरांच्या कुळात गेली असेल का? पण पाखरांनाही कुळ असतं हे कधी तिनं सांगितलं नव्हतं. तसं तिच्या बोलण्यातून ऐकलेलं सुद्धा नव्हतं. पण ती पाखरांच्या पिढ्यानपिढ्या ओळखायची. त्या पिढ्यांविषयी बोलायची. पाखरांच्या सुख – दुःखाच्या गोष्टी सांगायची. गावालगतच्या बारवाजवळून एक पायवाट तळ्यात उतरायची. ती पायवाट थेट पांदीतून गारदेवाकडे वळायची. तिथं पडीक जमीन होती. तिथं जनावर बांधली जायची. नेमक्या त्याच ठिकाणी पावसाळ्यात गवत उंच वाढायचं. कुठं खुरटं गवत माजून जायचं. तिथं वाढणाऱ्या पाखरांविषयी ती बोलत राहायची. जणू ती पाखरू होऊन माझ्याभोवती भिरभिरत राहायची. तिचं पाखरांविषयी असलेलं प्रेम पाहून तिनं या पाखरांच्या कुळात जन्म घेतला असावा असं सारखं वाटायचं. मातीवर उमटलेली नक्षी मनाचा तळ ढवळीत होती. ती नक्षी बघितली अन् तिनं अनुभवलेली पक्ष्यांच्या बाळंतपणाची गोष्ट आठवली. पारूबाई, कलूबाई, सितामाय अशा अनेक मैत्रिणी तिच्यासोबत असत. रानातली कामं संपली की, सरपण गोळा करायच्या. त्याच सरपणावर चुली पेटल्या जायच्या. सगळ्यांच्या घरी जनावरं होती. गोठ्यात वासरं असायची. त्या वासरांना कोवळं गवत आवडत असे म्हणून या सगळ्या बाया मूठ – मूठ का होईना पण हिरवं गवत कापून घ्यायच्या. सरपण आणि गवताचं ओझं डोक्यावर घेऊन पायवाट तुडवीत घराच्या रस्त्याला लागत. हिवाळा सुरू झाला की, गवत चांगलच वाढायचं. बाया कामं उरकून गवताच्या ओढीनं सरसावत. त्यात आजीसुद्धा असायची. पण तिची गोष्टच निराळी होती. उंच वाढलेलं गवत कवळाभर घ्यायला सोपं जायचं म्हणून त्या सगळ्याजणी पायवाट सोडून बाजूला जायच्या. तिथं गवत मिळायचं. जिथं उंच वाढलेलं गवत होतं नेमक्या त्याच ठिकाणी ती लगबगीनं गेली. पण गवताला हातही लावत नव्हती. तिच्या मैत्रिणींनी कवळाभर गवत आणून भाऱ्यावर बांधलं सुद्धा ! तिचं असं रिकाम्या हाती रेंगाळणं मला अजिबात आवडलं नाही. तिनं फक्त गवत घेतल्यासारखं केलं अन् पायवाटेला लागली. तळ्यातल्या रानात येईपर्यंत फारशी कुणाला बोलली सुद्धा नाही. कधी – कधी ती अबोला धरायची. त्यामुळे तिचं असं वागणं नवखं नव्हतंच! आर्वी गावातच वडिलांची गुरुबहीण राहायची. तिला आम्ही आत्या म्हणून बोलायचो. तिच्या घरी खूप गाई असायच्या. आमच्या घरी दुधाची कमतरता होती म्हणून तिनं एक गाय आंदण म्हणून दिलेली. त्या गाईचा सांभाळ करता – करता त्या गाईनच आमचा सांभाळ करायला सुरुवात केली. तिचे लाड पुरविण्यासाठी ती कोवळं गवत आणत असे. ती घरी असली की, गवत आणायची जबाबदारी माझ्यावर असायची. मी अशी कामं चोख करायचो. तिची शाबासकी मिळवायचो. तिच्या भाऱ्यावर गवताची पेंढी नव्हती. कशी असणार ? तिनं गवत घेतलच नव्हतं. नुसती गवताजवळ रेंगाळली होती. मला सांगितलं असतं तर कवळाभर गवत घ्यायला किती वेळ लागला असता. मला वाटलं ती चालत – चालत गवत घेईलही. पण तसं काही घडलं नाही. तळ्यात उतरायच्या आधीच अंधारानं हात – पाय पसरायला

सुरुवात केली. घरी आलो तेव्हा दिवे लावायची वेळ झाली होती. ती घरी आली की, पाणी चुलीवर कोमट करायची. हात - पाय धुवायची. काळा चहा करून परातीत ओतायची. माळवदाच्या घरात बसून चहा पीत असे. पण आज तिनं चूल पेटविली आणि हातावरच्या भाकरी करायला बसली. तिच्या बोटाचे ठसे भाकरीवर उमटत. भाकर करपली की, ते ठसे अधिक उठून दिसत. तिनं केलेल्या हातावरच्या भाकरीला चव असायची. आज ती फक्त एक आठवण म्हणून मागं उरलेली. तिच्यासोबत ठशाची भाकरही निघून गेली. त्या दिवशी तिनं भाकरी झाल्यावर पिठलं हाटून घेतलं. जेवली आणि झोपी गेली. मला वाटलं तिला बरं वाटत नसावं. गावातल्या डॉक्टरकडून गोळ्या आणून द्याव्यात असं मनात आलं. तिला तसं विचारलं सुद्धा. पण ती नको म्हणाली. तिच्या कपाळावर हात ठेवला. अंगात ताप नव्हता. त्यानंतर मी पिठलं भाकर वाढून घेतलं. जेवण करून तिच्याच गोधडीत झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी शाळेतून घरी आलो अन् लगोलग रानाची वाट धरली. बायांची कामं उरकली होती. त्या सगळ्याजणी गवत घ्यायच्या तयारीतच होत्या. मी विळा घेऊन रानात आलो होतो. जिथं आजी रेंगाळली होती नेमकं तिथलच गवत हातातल्या विळ्यानं कापणार होतो. पण तिथं तर आजी अगोदरच पोहोचलेली दिसली. इथलं गवत घेऊ का ? मी म्हणालो. तिनं मान हलवून नकार दिला. मी जवळ गेलो तसं तिनं गवताकडं बोट दाखविलं. मी कुतूहलाने पाहत होतो. लांडोर गवतात बसलेली पाहून आनंद तर झालाच पण ती एकटीच इथं का बसली असावी असाही प्रश्न पडला होता. बायांचं आमच्या खाणाखुणाकडं लक्ष होतं हे आम्हा दोघांना कळालच नाही. तिघीजणी लगबगीनं उंच वाढलेल्या गवताजवळ पोहोचल्या. तेवढ्यात गवतात बसलेल्या लांडोरीन पोबारा केला. त्या गवतात पाच अंडी दिसली. ती अंड्याला उब पुरवीत होती. तर आजी त्या सगळ्यांवरच माया करत होती. जणू ती पक्ष्यांचं बाळंतपण करत होती. लांडोरीच्या बाळंतपणाची गोष्ट सर्वप्रथम तिलाच माहीत होती. मला तर फार उशिरा कळाली. जेव्हा कळाली तेव्हा तर माझ्या हातात विळा होता. तिथलच गवत कापायला निघालो होतो. तिनं मला थोपविलं नसतं तर कल्पनाही करवत नाही. तिनं त्या लांडोरीला दत्तक घेतलेलं. सकाळी रानात पोहचलं की, ती उंच वाढलेल्या गवतात डोकावून पाही. काम करत - करत तिचं लक्ष त्या गवताकडंच असायचं. दुपारची भाकर गवताच्या आडोशानच खायची. ती विहिरीकडं गेलीच नाही. सायंकाळी बाया गवत कापायला येतील म्हणून ती अगोदरच तिथं पोहचायची. तिच्या अशा वागण्याचं कारण हळू - हळू कळू लागलं. ती लांडोरीकडं जनावरांना येऊ देत नसे. तशी मोकाट कुत्र्यांनाही फिरकू देत नसे. तिला लांडोरीच्या अंड्यातून पिलं बाहेर येण्याची वेळ माहित होती. ती घर सांभाळीत आंदण मिळालेल्या गाईची जशी काळजी घ्यायची तशी रानपाखरांच्या घरट्यांची सुद्धा काळजी घेत असे. एका सायंकाळी आम्ही घराकडं निघालो होतो. डोक्यावर सरपणाचा भारा. त्यावर हिरव्या गवताच्या काही काड्या. तळ्यात उतरण्यापूर्वी उजवीकडील गवतात हालचाल जाणवली. आम्ही सगळेजण जागीच थांबलो. तेवढ्यात एक लांडोर पायवाटेवरून आडवी गेली. तिच्या पाठोपाठ पाच पिलं सुद्धा होती. एवढं सुंदर दृश्य यापूर्वी पाहिलेलं नव्हतंच. ती सगळ्यांच्या पुढं होऊन त्या लांडोरीला पाहत होती. फक्त एकदाच लांडोरीनं पाठीमागं वळून बघितलं. तशी ती पिलांसह ओढ्यात उतरली. दिसेनाशी झाली. लांडोर तिच्या पिल्लांना घेऊन भेटायला आली होती. आजी म्हणाली. ती लांडोर त्या गवतातीलच आहे हे कशावरून कळालं गं तुला? मी म्हणालो. पण ती लांडोर तिच्याकडंच पाहत होती हे कळायला उशीर लागला नाही. एखाद्याच्या डोळ्यात पाहून त्याला काय म्हणायचंय याची जणू विद्याच तिनं हस्तगत केलेली होती. म्हणून माणूसच काय पण पाखरांच्या डोळ्यातील भावही तिला टिपता यायचे. तिचं म्हणणं खरं आहे की खोटं हे तपासण्यासाठी मी सकाळीच रानाची वाट धरली. त्या उंच वाढलेल्या गवतात डोकावलो. पण तिथं कुणीच नव्हतं. लांडोरीसह अनेक पक्ष्यांची बाळंतपणं तिनं केलेली. चंडोल पाखराच्या घरट्याभोवती बोरी - बाभळीच्या काट्या टाकायची. ती चंडोल पक्ष्याला गवतातली



चिमणी’ म्हणून ओळखत असे. त्या पाखराच्या डोक्यावर लहानसा तुरा दिसायचा. गवतातच घरटं करायची. एखाद्या दगडाचा आधार घ्यायची. या पाखरांचा थवा गवतातून चरताना दिसे म्हणून तिचं नाव गवतातली चिमणी दिलं असावं. ते फक्त तिच्या आणि माझ्या पुरतेच मर्यादित होतं. तिनं अशा अनेक चिमण्यांची ओळख करून दिलेली. गवतात घरटं करणाऱ्या – गवतातल्या चिमण्या. घरात घरटं करणाऱ्या – घरातल्या चिमण्या. लटकतं घरटं करणाऱ्या – पिवळ्या चिमण्या. टाकळणीच्या झाडावर मुक्काम करणाऱ्या – रानचिमण्या. गुलाबी चिमण्या, चंदेरी चिमण्या अशा कितीतरी चिमण्यांच्या गोष्टी रंगवून सांगायची. ती या चिमण्यांना आवाजावरूनही ओळखायची. तिचं पक्ष्यांच्या आवाजाविषयीचं असलेलं ज्ञान मला आजही अचंबित करतं. तिचं पक्ष्यांसोबतचं नातं मी समजून घेत होतो. अनेक पुस्तकातून पक्ष्यांची शास्त्रीय नावे शोधून काढतो. पण आजीनं सांगितलेल्या नावावरच येऊन थांबतो. घरभर वावरणाऱ्या चिमण्या आज कुठंच दिसत नाहीत. मातीच्या घरातला त्यांचा निवाराच संपुष्टात आलाय. ज्या मूठभर चिमण्या उरल्या आहेत त्यांना बाळंतपणाची सोय सुद्धा उपलब्ध होत नाही. त्यांनी सिमेंटच्या जंगलात घरटी तरी कुठं बांधावीत? अंडी कुठं घालावीत? चांदवा कुठं बांधावा? त्यांची विणच थांबलीय. बरं जिथं कुठं या चिमण्यांना घरटी करायला जागा मिळते तिथं तिच्यासारख्या बायाच नाहीत. चिमण्यांसाठी तांदूळ ठेवणाऱ्या. सतत खिडक्या उघड्या ठेवणाऱ्या. चिऊ – काऊच्या गोष्टी सांगणाऱ्या. घराला घरपण देणाऱ्या आजी घरातून हद्दपार होत चालल्या आहेत. घरातल्या लेकीचं बाळंतपण या आजीच करायच्या. सोबत पक्ष्यांचीही बाळंतपणं करायच्या. पण आज सारं काही डोळ्यासमोर बदलताना दिसतय. ती पाखरांच्या अनेक आठवणी ठेवून गेली तिच्याच बाळकडूवर पक्ष्यांच्या पायांची नक्षी शोधत फिरतोय. तिनं ज्या कुळात जन्म घेतलाय त्या कुळाचा धांडोळा घेतोय. आजी म्हणायची – पाखराच्या घरट्याला काडी – काडी मिळू दे मी म्हणायचो – माझे पाय रानवाटेकडं वळू दे पक्ष्यांच्या बाळंतपणाची गोष्ट मला माझ्या मुलीला सांगायची आहे.



*****

## माहितीचा उजाळा उत्तरे

१ – Ardeidae

२ – गाय बगळा Bubulcus ibis

३ – Ciconia Ciconia पांढरा करकोचा

४ – १५ प्रजाती

५ – अँग्लिया रस्किन विद्यापीठ.

६ – समुद्री बगळा (कसंबे २०१६)

७ – Great Egret मोठा बगळा

८ – National Audubon Society

९ – White Egret

# सांगलीचे ज्येष्ठ पर्यावरणवादी : पापा पाटील



**रोहन भाटे**

सांगलीचे ज्येष्ठ पर्यावरणवादी कार्यकर्ते अजित श्रीधर पाटील यांचे नुकतेच वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. ते पापा पाटील ह्या टोपण नावाने सर्वांनाच परिचित होते. सांगली जिल्ह्यातील मुलांना प्रत्येक सुट्टीला कोयना व चांदोलीच्या जंगलात भटकंतीसाठी घेऊन जाणाऱ्या ह्या अवलियाने पुढील पिढीला निसर्गाची आवड निर्माण व्हावी, पर्यावरण घडामोडी संबंधी नवीन पिढीला जागरूकता राहावी, यासाठी ते शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न केले. कर्करोग सारख्या दुर्धर व्याधीने त्रस्त असतानाही अगदी निधनाच्या दोन दिवस अगोदर ते सांगली येथे भरलेल्या पक्षी मित्र संमेलना मध्ये अध्यक्ष या नात्याने सहभागी झाले होते. भारतात, चिपको आंदोलन नंतर, पश्चिम घाट बचाव मोहिमेने खूप मोठी जनजागृती केली व संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले. या मोहिमेचे पापा पाटील हे प्रमुख सदस्य होते . बाबा आमटे यांच्या कार्याने प्रेरित होऊन तरुणपणी पापा पाटील हे आदिवासींच्या सेवाकार्यात बस्तरच्या जंगलात पोचले. आदिवासी जनजीवनाची जवळून ओळख करून घेत असताना त्यांना जंगलही समजून घेता आले, व किंबहुना त्यांच्यामुळे त्यांना जंगल भ्रमंती, झाडे, पशुपक्षी यांच्या विषयी एक आवड निर्माण झाली. पिढीजात शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या पापा पाटील यांनी व्यवसायापेक्षा शेती करण्यासाठी आपली पसंती दाखवली. त्यामुळे ही शेताला जोडून जंगल भ्रमंती हे एक पूरक क्षेत्र त्यांना मिळाले. शेती बघत असताना सांगलीच्या पश्चिमेला असणाऱ्या चांदोलीच्या जंगलात त्यांनी १९७० पासून भटकंती सुरू केली. १९७६ साली चांदोली धरणाच काम वारणा नदीवर चालू झाले व त्यामुळे त्या परिसरातले सुमारे ४० ते ४५ गावे पुनर्वसित झाली व संपूर्ण खोरे निर्मनुष्य झाले. जुन्या गावांचे गावठाण क्षेत्रात गवत कुरण निर्माण करण्याच्या शासनाच्या प्रयत्नाला त्यांनी हातभार लावून हे जंगल संरक्षित व्हावे यासाठी प्रयत्न सुरू केले. १९८४ साली चांदोली ते जंगल हे अभयारण्य म्हणून घोषित झाले व त्यामुळे त्याला एक संरक्षणाचा दर्जा मिळाला पापा पाटील व त्यांचे निकटचे सहकारी प्रा.सुरेश गायकवाड सर यांच्या सतत प्रयत्ना मुळे हे सर्व शक्य झाले. हे कार्य करीत असताना पश्चिम घाटातून वाहणारी कृष्णा नदी बचावाची चळवळ जोर धरू लागली. कृष्णा खोऱ्यात वास्तव्यात असणारे पापा पाटील हे या मोहिमेचे एक प्रमुख सदस्य म्हणून कामाला लागले व त्यांनी बोटीतून कृष्णा उगमापासून ते मचलीपट्टणम सागरापर्यंत प्रवास करून कृष्णा नदी बचावाच्या चळवळीला फार मोठा हातभार लावला व योगदान दिले. कृष्णा नदी बचावाची मोहीम हाती घेतल्यानंतर केरळ, तामिळनाडूच्या जंगलात सायलेंट व्हॅली च्या एकस्पीडीशन मोहीम मध्ये ते सहभागी झाले. या मोहिमेत सहभागी झालेल्या सदस्यांनी, ह्या प्रेरणेतून पश्चिम घाट बचाव मोहीम हाती घेण्याचे ठरवले व परत महाराष्ट्रात आल्यावर पश्चिम घाटातील जंगले वाचवावीत यासाठी कळसुबाई शिखरापासून, भीमाशंकर, कोयना, चांदोली , राधानगरी ते तिलारी अशी मोहीम आखण्यात आली व व्यापक प्रमाणात पश्चिम घाटातील या जंगलांचे महत्त्व अधोरेखीत करण्यासाठी जनजागृती मोहीम शहरी व ग्रामीण भागात आखण्यात आली. प्रत्यक्ष जंगलातून प्रवास, वाटेतील गावांमध्ये थांबून ग्रामस्थांचे उद्बोधन, लगतच्या शाळेंना भेटी देऊन गावांमध्ये जनजागृती, यामुळे सरकारचे पश्चिम घाट बचाव मोहिमेची दखल घेतली व त्या संवर्धनासाठी एक आराखडा बनला. महाराष्ट्र शासनाने पश्चिम घाट विकास कार्यक्रम निर्माण करून त्यासाठी निधीची तरतूद केली व त्यातून पश्चिम घाटात होणारी मातीची धूप थांबवणे, मृदसंधारण, वृक्ष लागवड, वनबंधारे, समतोल चर, यासारख्या उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली. जागतिक बँकेने ही अर्थसहाय्य देऊन महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमाला हातभार लावला. समाजातील पर्यावरण प्रेमी लोकांनी एकत्र येऊन उभारलेली पश्चिम घाट बचाव मोहीम याला यश आले व शासन दरबारी याची दखल घेण्यात आली हेच या मोहिमेचे यश ठरले, व पापा पाटील हे त्यातील एक प्रमुख कार्यकर्ते होते. पश्चिम घाट

क्षेत्रात शिकारीमुळे कमी झालेल्या वाघांची संख्या व त्यांचे जंगलावर झालेले दूरगामी परिणाम हा विषय पापा पाटलांनी हाती घेतला व पश्चिम घाट व क्षेत्रात पुन्हा वाघाची डरकाळी ऐकू यावी यासाठी चांदोली व कोयनेच्या जंगल क्षेत्राला व्याघ्र प्रकल्प घोषित करावा अशी मागणी त्यांनी सरकारकडे लावून धरली व दहा वर्षाच्या अथक प्रयत्नानंतर केंद्र शासनाने सह्याद्री व्याघ्र प्रकल्प घोषित केला. पापा पाटील यांच्या या पाठपुराव्याची दखल घेऊन राज्य सरकारने त्यांची महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळावर नेमणूक करून त्यांना सन्मानित केले. सह्याद्री व्याघ्र प्रकल्प घोषित झाल्यानंतर पश्चिम घाट क्षेत्रातील बॉक्साइट खाणींमुळे वाघांचे भ्रमण मार्ग खंडित होत असून त्यांचे वन्यजीवांच्या हालचालीवर परिणाम होत असल्याचा अभ्यास पापा पाटलांनी केला व ह्या खाणींवर निर्बंध आणावे त्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा चालू केला. हे करीत असताना वनविभागाच्या कोणत्याही परवानगी न घेता काही खाणी चांदोलीच्या जंगलात सुरू असल्याचे त्यांना समजले. बेकायदेशीर बॉक्साईट खाणींचे हे प्रकरण त्यांनी सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या एका समितीच्या निदर्शनास आणून दिले. समितीचे त्या तक्रारीचे तातडीने दखल घेऊन व हे बॉक्साईट खाणकाम बेकायदेशीर असल्याचे निदर्शनास आल्यामुळे खाणकाम बंद पाडले व पश्चिम घाट क्षेत्रात कोठे कोठे असे बेकायदेशीर खाणकाम सुरू आहे यासाठी अहवाल वन विभागाकडून मागवला. पापा पाटील यांच्या या कार्यामुळे बेकादेशीर खाणकामांना आळा बसला. सह्याद्री व्याघ्र प्रकल्प प्रकल्प प्रशासनानेही याची दखल घेऊन राधानगरी ते चांदोली या भ्रमण मार्गाला संरक्षणाचा दर्जा मिळावा यासाठी शास्त्रीय अभ्यास सुरू केला आहे. पापा पाटील यांच्या निसर्ग संवर्धनाच्या लढ्याला बळकटी मिळाली ती ३२ शिराळाच्या जिवंत सापांच्या खेळावर मुंबई उच्च न्यायालयाने आणलेले बंदी ह्यामुळे. ३२ शिराळा येथे नागपंचमीच्या दिवशी जिवंत सापांचे पूजेचे नावाखाली खेळ केले जातात व त्यावर तत्काळ बंदी आणावी त्यासाठी पापा पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. या याचीकीमुळे सांगली जिल्ह्यात एकच खळबळ उडाली, व पापा पाटील यांना धमक्या देणे सुरू झाले. परंतु या धमक्यांना भीक न घालताही जनहित याचिका लढवली व पुराव्यानिशी हे सिद्ध केले की पुरातन काळात ही सापांच्या प्रतिमांची पूजा केली जात होती. पापा पाटील यांनी दाखल केलेल्या पुराव्यांची कोर्टात दखल घेतली गेली व जिवंत सापाच्या खेळावर तसेच त्यांना पकडण्यावर बंदी आणली. नागपंचमीच्या दिवशी जिल्हाधिकारी यांच्या देखरेखीखाली सण साजरा करावा असा आदेश कोर्टाने दिला. त्यामुळे साप पकडणे व त्यांचे खेळ करणे ह्याबाबत जनजागृती निर्माण होऊन असे प्रकार आता खूप प्रमाणात कमी झाला आहेत. कृष्णा नदीचे डोहात मगरीचे वास्तव्य शेकडो वर्षांपासून आहे. परंतु गेल्या २५ वर्षात कृष्णा नदीवर बंधारे झाल्यामुळे मगरींचे प्रवास मार्गात अडथळे निर्माण होऊ लागले, व त्यांच्या अधिवासावर परिणाम झाला. परिणामी मगरी पाण्याच्या बाहेर येऊ लागल्या. अगदी काही ठिकाणी माणसांवर हल्ले झाले. मगरीला सुरक्षित आश्रयस्थान मिळावे यासाठी पापा पाटील यांनी खूप कष्ट घेतले. पाण्याच्या बाहेर आलेल्या मगरी पकडून त्यांना सुरक्षित अशा चांदोली धरणात सोडण्याचे काम पापा पाटील यांनी वनविभागाच्या सहकार्याने सुरू केले. त्यांनी सुमारे ५० ते ६० मगरी गेल्या पंचवीस वर्षात पकडून चांदोली धरणात स्थलांतरित केल्या आहेत. हे केल्यामुळे लोकांची मगरींविषयीची भीती कमी झाली. कोयना व चांदोलीच्या जंगलातून नरक्या या औषधी वनस्पतीची तस्करी प्रकरण हे पापा पाटील यांनी उघडकीस आणून अनेक वर्ष चालू असणाऱ्या ह्या अवैध्य तस्करी कडे वनविभागाचे लक्ष वेधले व त्याच्यावर प्रतिबंधक उपाययोजना करण्यास सरकारला भाग पाडले. पापा पाटलांच्या निधनाने एक लढवल्या निसर्ग रत्न हरपले आहे त्यांनी तयार केलेल्या कार्यकर्ते यांनी त्यांनी केलेले काम पुढे चालू ठेवतील अशी अशा व्यक्त होत आहे. दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे करे माझे जुळती पापा पाटलांच्या दिव्य कार्याला मनापासून नमस्कार

*****

# जादूची नगरी...मेळघाट !!!



**सौ. विदुला कुलकर्णी,**
पक्षी अभ्यासक आणि
पक्षी छायाचित्रकार पुणे, महाराष्ट्र

सातपुड्याच्या पर्वतरांगेत वसलेला, घनदाट जंगलांचा, दऱ्याखोऱ्यांचा, प्राचीन इतिहासाच्या खुणा पण तितक्याच प्रेमाने सांभाळणारा, वन्य प्राण्यांना मोकळा श्वास घेता येत असलेला, निसर्गाचे विलोभनीय दान पदरात पडलेला भूप्रदेश म्हणजे मेळघाट. क्षेत्रफळानुसार सर्वाधिक समृद्ध असेलेले क्षेत्र ज्यामध्ये अनेक घाटांचा मेळ आपल्याला बघायला मिळतो आणि मेळघाट हे नाव सार्थकी वाटते. हे सगळे मला अनुभवायला मिळाले ते माझ्या पक्षी निरीक्षण आवडीमुळे. जेव्हा मला कळले की मेळघाट मध्ये पक्षी गणनेचा कार्यक्रम २९ डिसेंबर ते २ जानेवारी होणार आहे तेव्हा लगेचच सगळी औपचारिकता पूर्ण केली. अकोट पासून पुढे आमची सोय मेळघाटच्या व्यवस्थापकांनी केली होती. शहानुर ह्या ठिकाणी संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा आणि त्याचे स्वरूप आम्हाला सांगण्यात आले. जेवण करून सगळेजण बस ने जे कॅम्प आम्हाला वाटून दिले तिथे जायला निघालो. एका कॅम्प पाशी पोहचलो तेव्हा तेथील स्थानिक वनदेवतेच्या प्रतिमेने आमचे लक्ष्य केंद्रीत केले. त्या देवतेला बिडीवाले बाबा म्हणून तेथील आदिवासी लोक संबोधतात. खरोखरची बिडी आणून ह्या वनदेवतेच्या तोंडात ठेवली जाते. अलौकिक पालकत्व (supernatural guardianship) सांभाळण्याची आणि रोगराईपासून गावाचे संरक्षण करण्याची जबाबदारी ह्या बाबांनी उचलली आहे आणि तेच ह्या कोरकू आदिवासींचे रक्षण करतात, त्यांना मार्ग दाखवतात अशी श्रद्धा आहे. दुसऱ्या कॅम्प ला पोहचत असताना नदीपात्रावरून एक ब्लॅक स्टॉर्क ( काळा करकोचा) उडत गेल्याचे लक्षात आले. एका दूर दगडावर बसलेले हे देखणे रूप पाहून मन सुखावले. हिवाळी पाहुणा म्हणून आपल्याकडे येणारा हा पक्षी आहे. अशीच मजल दरमजल करत आमची स्वारी ३० तारखेला रात्री ८.४५ वाजता कोलकास सेमाडो कोअर एरिया मध्ये पोहचली. मोबाईल नेटवर्क झोपले होते. फ्रेश झालो, जेवलो आणि शतपावली करायला बाहेर पडलो. जंगलात विरून जायला मन धावत होतं. किर्रर अंधार, सोबत सुस्पष्ट आकाशात दिसणारी नक्षत्र, तारे आणि साथीला घुमणारे घुबडांचे आवाज त्या वातावरणात वेगळीच नशा चढवत होते. ना स्वयंपाकाची गडबड, ना धुणी धुणं, ना भांडी घासणं, ना ऑफिस ना कोणती मिटींग. कसलं भारी वाटत होतं. असा वर्षाचा शेवट जर दरवर्षी अनुभवता आला तर किती मज्जा येईल. खोलीत येऊन ढाराढूर झोपलो. छपरावर माकडांच्या उडया मारण्याचे आवाज येत होते त्याने दचकायला होत होते. चौकशी केल्यावर कळले कि ते माकड नव्हते तर मोठाले उंदीर होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वाजेपर्यंत सगळे आवरून पक्षी गणना करायला सज्ज झालो. आमची गाईड प्रियांका येईपर्यंत कॅम्पस मधेच पक्ष्यांच्या नोंदी करू लागलो. काही चेकलिस्ट करून झाल्यावर न्याहारी केली आणि जवळच असणाऱ्या नदीकाठाजवळ निरीक्षण आणि गणना करायचे सहमताने ठरवले. अचानक ५ मोर मस्तपैकी उडत नदीपात्राच्या दिशेने काठावर उतरले. पांढऱ्या दगडावर बसलेले ते मोर, त्यांच्या जवळून वाहणारी ती नदी व मागे सुंदर गर्द झाडी...हिरवा शालू परीधान केलेली वसुंधरा. अहाहा. काय नयनरम्य देखावा होता तो. जणू एखाद्या उत्कृष्ट चित्रकाराच्या कुंचल्यातून अवतरलेली रंगांची सुरेख उधळण. क्षणभर विसावलो आणि तो नजारा डोळ्यात आणि हृदयात साठवून भ्रमंती पुन्हा सुरू केली. एक तुरेवाला सर्पगरुड (Crested serpent eagle) सतत त्याचे अस्तित्व आणि प्रदेश दर्शवण्यासाठी की काय पण आमचा पाठलाग करत होता. आम्ही त्याच्या राज्यात घुसखोरी केलेली तो टेहळणी करून बघतही होता. काळा अवाक (Red-naped ibis), मोर शराटी (Glossy Ibis), तारवाली भिंगरी (Wire-tailed swallow ), नदी सुरय (River Tern), खंड्या (White throated kingfisher), टोई पोपट (Plum headed parakeet) अशा पक्ष्यांचे नदीच्या काठाकाठाने निरीक्षण आणि नोंदी करत पुन्हा जंगलातील झाडाझुडपात घुसलो. आमच्या अस्तित्वाने पक्षी सावध झाले, काही झुडुपांमध्ये गायब झाले आणि आवाज मंदावले. आम्ही तिथेच झाडांच्या फांद्यांमध्ये स्वतःला झाकून टाकून, कॅमेरा सज्ज ठेवून वाट बघू लागलो. १०-

१५ मिनिटांनी पुन्हा नुसतेच आवाज सुरू झाले पण पक्षी दिसेनात. काही कॉल रेकॉर्ड केले कारण ते आम्ही ओळखू शकलो नाही. नंतर ते पक्षी तज्ज्ञांकडून समजून घेतले. जेवणासाठी थोडं थांबून पुन्हा दुपारी ४- ४.१५ वाजता निघायचे ठरले. म्हणून नदीकाठाने निरीक्षण करत होते आणि अचानक मला मलबारी कवड्या धनेश (Malabar Pied - Hornbill) उडत येताना दिसला आणि लगेचच पुढे निघून गेला. कॅमेरा घेऊन फोटो काढण्याइतका पण वेळ त्याने दिला नाही. त्याचा फोटो घेता आला नाही ह्याचे खूप वाईट वाटले. गवतातून, दगड-गोटे, पाण्याचा झरा,पायवाटा, घनदाट झाडी असा वेगवेगळा ९ कि.मी. चा प्रदेश पायांखाली तुडवला आणि कॅम्प वर परतलो. रात्री उशिरा मनीष ढाकुलकर सरांसोबत बोलत असताना कळले की मलबारी कवड्या धनेश (Malabar Pied - Hornbill) हा मेळघाटातील दुर्मिळ पक्षी आहे. माझ्याकडून अशा पक्ष्याची नोंद झाली ह्याचा खूप आनंद झाला. रात्रीचे जेवण झाल्यावर रजयांमध्ये गुरफटून घेतले. एवढ्या शांत आणि गाढ झोपेचा अनुभव मी ह्यापूर्वी कधीच घेतला नव्हता. नवीन आव्हाने स्वीकारायला पुन्हा सज्ज झालो. तिथला गवताळ प्रदेश आज पिंजून काढायचे ठरवले. गवत उंच होते. सगळे हातभर अंतर ठेवूनच चालत होतो. सगळ्यात पुढे कोरकू समाजाचे आमचे २ खंबीर पहारेदार, मध्ये आम्ही पक्षी अभ्यासक आणि मागे प्रियांका असा काफिला निघाला होता. वन्यजीवांच्या पायांचे ठसे, हत्ती आणि अस्वलांची विष्ठा मधून मधून त्यांच्या अस्तित्वाची आठवण करून देत होती. गवतातून प्राण्याच्या हालचालीची चाहूल लागताच आम्ही सगळे स्तब्ध उभे राहिलो. २ मिनिटे जे काही आमचे धाबे दणाणले ते शब्दात सांगणे कठीण. भेकर (बार्किंग डियर) असावे असा निष्कर्ष निघाल्यावर जीव भांड्यात पडला. अस्वलांचा राबता तिथे वाढला होता हे जाणून होतो त्यामुळे अधिक सावधगिरी बाळगून पुढे चालत राहिलो. ३-४ तास नुसतं गवत तुडवत चालत होतो पण एकही पक्षी दिसला नव्हता. जंगल शांत पहुडले होते. अंगाला गवत घासून जात होते. वनस्पती, किडे अंगाला चिकटत होते. काही किडे तर इतके चिवट होते की काडीने घासून त्यांना अंगापासून वेगळे करावे लागले. पल्लवपुच्छ कोतवाल/भृंगराज (Greater racket-tailed drongo) चे आवाज ऐकू येऊ लागले. ४ जणांचे साक्षात दर्शन झाले. संध्याकाळचे ५.३० वाजून गेले होते त्यामुळे जंगलातून बाहेर पडून मुख्य रस्त्याला लागलो. चांगलाच किलबिलाट ऐकू यायला लागला. राखी छातीचा वटवट्या (Grey breasted Prinia), शिंपी (Common Tailorbird), ह्यूमचा पर्णवटवट्या (Hume39;s Warbler), लाल छातीची माशीमार (Red Breasted Flycatcher), हिरवट वटवट्या (Greenish Warbler), चष्मेवाला (Indian/Oriental White Eye), तपकिरी गप्पीदास (Brown Rock Chat), छोटा गोमेट (Small Minivet), राखी डोक्याची पिवळी माशीमार (Gray-headed Canary-flycatcher) अशा अनेक पक्ष्यांच्या आवाजाची रेलचेल होती. पण दुर्दैवाने फार थोडे पक्षी दृष्टीस पडले आणि छायाचित्रण करता आले. अर्थात, आमच्या पक्ष्यांच्या गणनेमध्ये नक्कीच मोलाची भर पडली. जवळजवळ १२ ते १३ कि.मी. चालणे झाले होते. आमचे अवतार पाहण्याच्या लायकीचे राहिले नव्हते. केसांवरची धूळ झटकली तर खाली पडत होती, अंगावर रॅशेस उठल्या होत्या, त्वचा उन्हाने तापून काळवंडली होती पण तरी दुसऱ्या दिवशी चांगले sighting होईल अशी आशा होती. अंघोळ केली, जेवलो, बॅग भरून जे झोपलो ते एकदम ६ वाजताच सकाळी उठलो. आमच्या पक्षी गणनेचे २ दिवस संपून आज आम्ही कॅम्प सोडणार होतो. बस येईपर्यंत पुन्हा चेकलिस्ट बनवली. मोरघार (Changeable hawk-eagle / Crested hawk-eagle) आमच्या खोलीच्या समोर झाडाच्या टोकावर येऊन बसला. कोणतातरी रॅप्टर जवळपास आहे हे इतर पक्ष्यांच्या आवाजावरून कळत होते. हे महाराज शांतपणे जणू सिंहासनावर विराजमान होऊन पाहणी करत होते. बॅगेतील कॅमेरा पुन्हा बाहेर काढला. त्याचे फोटो कुठे काढून होत नाही तर एका पांढऱ्या मानेच्या करकोच्याने (Woolly necked stork) ने आपल्या लांब चोचीत अख्खा बेडूक पकडला. तो बेडूक कसा कसा चोचीतून आत जात होता हे मला पाहता आले आणि कॅमेरा मध्ये पण टिपता आले. बिचारा एक गाय बगळा (Cattle egret) त्याच्या बाजूबाजूने चालत होता आशेवर पण ह्या पठ्ठ्याने त्याला वास पण घेऊ दिला नाही. एकाला बेडूक सापडलेला बघून अजून दोन पांढऱ्या मानेचे करकोचे (Woolly necked stork) मोठे पंख फडफडत त्याच ठिकाणी आले आणि भक्ष्य शोधू लागले. पण बिचाऱ्यांची घोर निराशा झाली. तपकिरी डोक्याचा कुटूरगा (Brown-headed Barbet), राखी डोक्याची

पिवळी माशीमार (Gray-headed Canary-flycatcher), बलाक चोच धीवर (Stork-billed kingfisher), टकाचोर (Rufous Treepie), करण पोपट (Alexandrine Parakeet) ह्यांच्यात जणू आवाजांची जुगलबंदी सुरु होती. त्या रम्य सकाळी हे मधुर नाद मनाच्या हिंदोळ्यावर डोलत राहिले. आमची बस आली आणि पाय निघत नव्हता तरी निघावे लागले. सर्व अभ्यासकांनी मिळून इ-बर्ड वर पक्ष्यांच्या एकूण ६५८ इतक्या याद्या अपलोड केल्या. पक्षी अभ्यासक श्री. मनोज बिंड सर आणि श्री. प्रशांत निकम सर ह्यांनी प्रथमच नारींगी छातीचा हरियाल (orange breasted Green Pigeon) ह्या पक्षाची मेळघाटात नोंद केली. त्यामुळे मेळघाटातील पक्ष्यांच्या प्रजातींची संख्या जी पूर्वी ३०७ होती ती आता ३०८ अशी नोंदवण्यात आली. ह्या पक्षी गणनेचा संक्षिप्त अहवाल बनवण्यात आला. सदर पक्षी गणनेचा कार्यक्रम मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालक सुश्री जयोती बॅनर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व वन्यजीव विभागाचे उपवन संरक्षक यांच्या सहकार्यातून पार पडला. श्री. जयंत वडतकर सरांचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळत गेले त्यामुळे ह्या कार्यक्रमात सहभागी होण्याचे सौभाग्य आम्हाला प्राप्त झाले. माझे फोटोग्राफी क्षेत्रातील गुरु मनोज बिंड सरांना प्रत्यक्ष भेटण्याचा योग जुळून आला त्यामुळे माझ्यासाठी तर हा पक्षी गणनेचा कार्यक्रम म्हणजे दुग्धशर्करा योग होता. निरोप समारंभ आणि प्रशस्तिपत्रक वाटपाचा कार्यक्रम पार पडला आणि आम्ही सगळ्या आठवणी पिटाऱ्यात कैद करून परतीच्या प्रवासाला लागलो. नवीन वर्षाची सुरवात फारच अवर्णनीय आणि झकास झाली होती. अमरावती, अकोला आणि बुलढाणा या ३ जिल्ह्यात पसरलेला, महाराष्ट्रातील पहिला व देशाची शान वाढवणारा असा हा आपला मेळघाट व्याघ्र प्रकल्प; आपण जपला आणि जोपासला पाहिजे.




*****

## स्वागत नवीन सभासदांचे

(दि.१ जानेवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४)

| क्र | नाव | गाव | फोन न. | ई.मेल |
|---|---|---|---|---|
| १५६५ | कु. रक्षिता उकेश | अमरावती | 8788949480 | rakshitaukesh7gmail.com |
| १५६६ | श्री. सचिन श्रीकांत वर्तक | पुणे | 9922534555 | mesavagmail.com |
| १५६७ | सौ. हिमानी कपिल जोशी | पुणे | 9158142306 | himani11209gmail.com |
| १५६८ | श्री. रमेश वसंत शेणाई | पालघर | 9423354343 | ramesh.shenaigmail.com |
| १५६९ | डॉ. लक्ष्मण पां. नागपूरकर | भंडारा | 9422491940 | lp.nagpurkargmail.com |
| १५७० | श्री. भूषण कोलमाडवार | चंद्रपूर | 9403575975 | bhushankolmalwar2709gmail.com |
| १५७१ | श्री. श्वेता सुभाष कारंडे | महाबळेश्वर | 8390293135 | shwetakarande814gmail.com |
| १५७२ | श्री. विलास रवींद्र देशमुख | अकोला | 8983263164 | vilasdeshmukhgmail.com |
| १५७३ | सौ. वैशाली मिलिंद पांडे | ठाणे | 9969166569 | vaim2473gmail.com |


# पक्षीगान का? केव्हा? कोठे? लेखक शरद आपटे.

पक्षिमित्र संघटनेचे सक्रीय कार्यकर्ते आणि पक्ष्यांच्या आवाजाचे अभ्यासक श्री. शरद आपटे यांनी लिहिलेले पक्षीगान का? केव्हा? कोठे? हे पुस्तक नुकतेच वाचनात आले. अतिशय महत्वपूर्ण आणि कोणत्याही भारतीय भाषेत आणि भारतीय अभ्यासकाने पक्ष्यांच्या आवाजावर लिहिलेले हे पहिले पुस्तक आहे असे म्हणले तर वावगे ठरणार नाही.

१९९५ साली मिरज इथे भरलेल्या १५ व्या पक्षिमित्र संमेलनापासून शरद आपटे पक्षिमित्रशी जोडले गेले आहेत. त्यानंतर झालेल्या संमेलनात एखादा अपवाद वगळता सर्व संमेलनात त्यांनी सहभाग नोंदविले आहे. वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक संमेलनात त्यांनी निबंध सादर केले आहेत. पक्षिमित्रच्या व्यासपीठावरून पक्ष्यांचे आवाज या विषयावर बोलणारे लिहिणारे ते एक पक्षी अभ्यासक आहेत. आम्ही दोघांनी मिळून अनेक पक्षीनिरीक्षण मोहिमा केल्या आहेत त्यामुळे त्यांच्या कामाचा आणि आवाज ध्वनी मुद्रित करण्याच्या कामाचा माझा जवळून परिचय आहे. नुकतेच आम्ही Association of Avian Biologists In India या संस्थेने आयोजित केलेल्या National Symposium on Avian Biology या सिम्पोजीयमसाठी डेहराडून इथे एक आठवडा एकत्र होतो. तिथे त्यांनी सादर केलेला पेपर युगल गीत हा सर्वोत्तम म्हणून निवडण्यात आला. खरेतर सादर करणाऱ्यात मी आणि शरद आपटे हे दोनच सादरकर्ते असे होते कि ते हौशी वर्गात मोडत होतो बाकी सर्व एकतर या विषयात डॉक्टरेट करीत होते किंवा केलेली होती.

पक्षीगान या पुस्तकात एकूण १५० पानात २० प्रकरणे आहेत. या पुस्तकास थोर पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ माधव गाडगीळ यांची प्रस्तावना लाभली आहे यावरूनच त्याचे महत्व कळू शकते.

पक्षी का गातात, पासून सुरुवात होवून पक्ष्याच्या आवाजाची व्याख्या, पक्षी आवाज कसा करतात, पक्षी गाणे केंव्हा आणि कोणाकडून शिकतात, गाणारे आणि न गाणार, गाणे आणि साद, नक्कल, युगल गीत अशी एकेक प्रकरणे आवाजांचे गुपित उघडत जातात. ध्वनी म्हणजे काय, आवाजाचा आलेख म्हणजे काय व तो कसा वाचायचा, पक्ष्यांचे आवाज रेकोर्ड का करावेत आणि कसे करावेत हे ते सांगतात. पक्ष्यांच्या आवाजाचे ध्वनी मुद्रण




जगात प्रथम कोठे सुरु झाले त्यावेळी काय साधने वापरली जात होती हे विषद करताना भारतात ज्या भारतीय अभ्यासकांनी या कामाची सुरुवात केली अशा ६ अभ्यासकांच्या मुलाखतीवर आधारित माहिती आपणास वाचायला मिळते. माझा सुरेल प्रवास मध्ये त्यांच्या स्वतःच्या कामा बद्दल सविस्तर लिहिले आहे.

गाणारे (Oscine) आणि न गाणारे (suboscine) या पॅसरीफॉर्मस (फांदिधारी/कुलिंग) गणातील पक्ष्यांची ओळख करून देताना गाणाऱ्या पक्ष्याचा आणि माणसाचे भाषा शिकणे याचा किती जवळचा संबंध आहे ते अतिशय सोप्या आणि मार्मिक भाषेत विषद करताना आपल्या परिसरात दिसणाऱ्या कावळा, चिमणी, दयाळ उदाहरणे त्यांच्या आवजासाहित देतात.

**गाणे आणि साद** : हे प्रकरण फार महत्वाचे वाटते. कावळ्याची काव काव किंवा चिमणीची चिव चिव केंव्हा साद असते? आणि केंव्हा ती गाण्यात बदलते, कोकीळ पक्ष्याचा कलकलाट थांबून कुहू कुहू असे गाणे केंव्हा आणि का सुरु होते हे सांगताना कोकीळ नराच्या गाण्याच्या आणि गाव कावळ्याच्या घरटे करण्याचा कसा संबंध आहे ते पूराव्यासह सांगतात.

**नक्कल** : हे प्रकरणही असेच महत्वाचे आहे. पक्षी दुसऱ्या पक्ष्याच्या अगर प्राण्याच्या अगदी मानव निर्मित आवाजाची नक्कल का करतात हे ते सांगताना खाटिक, शामा अश्या पक्ष्यांनी केलेल्या नकलांची उदाहरणे ते देतात.

**युगुलगीत**

नर आणि मादी मिळून जेंव्हा गतात त्याला युगुल गीत म्हणतात. आपल्या राहत्या घराच्या परिसरात असे गाणारे पक्षी असतात त्याची आवजासाहित उदाहरणे ते देतात. मैना, भारद्वाज, कोतवाल असे आपले शेजारी समोर येतात.

**साद :** साद आणि गाणे यातील फरक ते सांगतात. गाणे हे विणीच्या काळात जोडीदार मिळविणे, घरासाठी परिसर निवडणे आणि प्रतिस्पर्धी नरास दूर ठेवणे या उद्देशाने दिले जाते. साद (call) हा अनेक कारणांनी केला जाणारा आवाज असतो. अन्न मागणे, नरमादी कामाची वाटणी, धोका सांगणे, शत्रूवर चालून जाणे, अन्नाच्या जागेवर अधिकार सांगणे इत्यादी.

**QR कोड :** या पुस्तकाचे आगळे वेगळे वैशिष्ट म्हणजे पुस्तकात वर्णन केलेले आवाज किंवा ज्यांचे आलेख दिले आहेत ते आवाज (१३१ प्रकारचे) वाचक QR कोड स्कॅन करून वाचता-वाचता ऐकू शकतात. हे सर्व आवाज असे निवडले आहेत कि, जे वाचक मानवी वस्तीत असणारे आणि सहज ऐकू येवू शकणारे पक्षी आहेत.

**संवाद** : या प्रकरणात स्थानिक लोक शेतकरी, आदिवासी, गृहणी यांच्याशी संवाद साधण्याचे ते सुचवतात. स्थानिक लोकांना पक्षी पाहुन पेक्ष्या ऐकून माहित असतात आणि त्या संबंधीच्या लोककथा, अख्यायीका प्रचलित असतात. त्यावरून पक्ष्यांचे आवाज आणि मानवी जीवन यांचा किती जवळचा सबंध होता हे कळते.

**शास्त्रीय आधार :** या सर्व लिखाणाला शास्त्रीय आधार काय? असा प्रश्न साहजिकच पडतो. संदर्भ सूचीतील पुस्तकांची यादी पाहता त्याला आधार असल्याचे सिद्ध होते. याशिवाय समाज माध्यमावर याला दुजोरा देणारे शोध निबंध उपलब्ध आहेत. त्यातील काही पुस्तके मी स्वतः वाचली आहेत आणि त्यांच्या झेरॉक्स प्रती करून शरद आपटे यांना पाठविल्या होत्या.

**कव्हर पेज :** पुस्तकाचे मुखपृष्ठ अगदी नाविन्यपूर्ण आहे. स्वतः लेखक शहरातील एका कॉलनीतील रस्त्यावर कान देवून दयाळ पक्ष्याचे गाणे ऐकत आहे. आजु-बाजुला लोकांची वर्दळ दिसते. या बाबत त्यांचा दावा पक्ष्यांच्या आवाजाचे शास्त्र समजून घेण्यासाठी आपल्या राहत्या घरा इतकी दुसरी योग्य जागा नाही कारण इथे असणारे २०-२५ प्रजातीचे पक्षी 24 x 7 आपल्या सहवासात असतात.

एकंदरीत पक्ष्यांचे आवाज यावर शास्त्रीय भाष्य करणारे मात्र सहज समजेल अश्या ललित भाषेत लिहिलेले पुस्तक सर्वच पक्षी निरीक्षकांना वेगळी अनुभूती देईल याची खात्री वाटते. पुस्तकाच्या निर्मितीत पक्षिमित्रचे व्यासपीठ महत्वाची भूमिका बजावते हे ते आवर्जून लिहितात.

सदर पुस्तक शरद आपटे यांनी स्वतः प्रकाशित केले आहे. ते त्यांच्याकडे मिळू शकते त्यांचा whatsapp no 9890384400. शिवाय बुक गंगा पुणे आणि जि आर ताम्हणकर सांगली इथे हि पुस्तके उपलब्ध आहेत.

*****

**डॉ अनिल पिंपळापुरे**
जेष्ठ पक्षी अभ्यासक नागपूर
९८८१७ १३४६६

# पुस्तक समीक्षण : गोंदिया जिल्हा पक्षी वैभव

पक्षी बघितला कि त्याची ओळख व जुजबी माहितीसाठी त्यासंबधी पुस्तक हाताशी असणे केव्हाही चांगले. केवळ इंटरनेटवर अवलंबून राहणेही योग्य ठरत नाही. आणि जेव्हा एखाद्या जिल्ह्यातील पक्षी बघायचे असल्यास पक्षी सूचीशिवाय पर्याय नसतो. पण त्यातही फक्त नाव परिसर याची माहिती असते. संपूर्ण जिल्ह्यात आढळणाऱ्या पक्षी प्रजातींची मोठ्या छायाचित्रासहित माहिती देणे हे खूप अवघड काम ठरते. पण गोंदिया जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी श्री राजेश खवले आणि त्यांच्या सहकाऱ्यानी हे अवघड काम हाती घेऊन पक्षी वैभव ची निर्मिती केली.

गोंदिया जिल्ह्यात आढळणाऱ्या ३२० पक्ष्यांच्या प्रजातींची थोडक्यात माहिती या पुस्तकात दिलेली आहे. यापैकी २९४ प्रकारच्या पक्ष्यांचे उत्कृष्ट छायाचित्रामुळे येथे पक्षी चांगल्या प्रकारे ओळखण्यास मदत होते. पक्ष्याचे नाव, आकार, शरीराचे वर्णन, अधिवास, खाद्य, प्रजननाची माहिती नेमक्या शब्दात व अचूकपणे देण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला गेलेला आहे. एखाद्या पक्षी प्रजातीची ओळख पक्की करण्यासाठी आवाज हा सगळ्यात महत्त्वाचा घटक मानला जातो. या पुस्तकामध्ये त्या-त्या पक्षी प्रजातीचा आवाज उदाहरणासहित समजावून सांगितला आहे.



त्यामुळे तो पक्का लक्षात राहतो. ही ‘पक्षी वैभव’ या पुस्तकाची जमेची बाजू म्हणता येईल. पक्षी छायाचित्रकारांनी घेतलेली मेहनत येथे पानोपानी दिसून येते. काही पक्ष्यांची छायाचित्रे थोडी अस्पष्ट दिसत असल्याने त्यातील बारकावे (ओळखी संबधी) अधिक प्रभावीपणे टिपता येत नाही. एवढा भाग वगळला तर पुस्तकाचा दर्जा उत्तम राखण्यात लेखक (वा संकलनात) काही कसूर ठेवली नाही.  जिल्हा माहिती कार्यालय,गोंदिया तर्फे हे पुस्तक प्रकाशित झाले आहे. शासनाची पक्षी पर्यावरणाबद्दल असणाऱ्या अनास्थेबद्दल आपण नेहमी ऐकतो, अनुभवतो. तेव्हा जिथे शासन अधिकारीच अभ्यासकाच्या भूमिकेत शिरून जर अशी निर्मिती करीत असेल तर ती नक्कीच स्वागतार्ह बाब ठरते. गोंदिया जिल्हा ‘पक्षी वैभव’ पुस्तकामुळे गोंदिया जिल्ह्यातील पक्षी वैभव दिवसेंदिवस वृद्धिंगत होईल यात शंका नाही.




**किरण मोरे**
सहाय्यक संपादक,महाराष्ट्र पक्षिमित्र

*****

# पुस्तक परिचय : झाडीपट्टीचे वैभव सारस

मी सुमारे १९९६-९७ सालापासून नियमित पक्षीनिरीक्षण करू लागल्यावर सुरुवातीचे काही वर्षे अमरावती जिल्हा आणि नंतर मेळघाट धुंडाळण्यात गेला. पुढे २००१ साली पहिल्यांदा कारंजा येथे झालेल्या विदर्भ पक्षिमित्र संमेलनास प्रथम हजेरी लावली त्यानंतर विदर्भातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये पक्ष्यांसाठी काम करणाऱ्या मंडळीची ओळख झाली अन पक्षी निरीक्षणाच्या कक्षा रुंदावल्या. पुढील वर्षी म्हणजे २००२ साली ताडोबा जवळ, जुनोना येथे झालेल्या संमेलनास हजेरी लावली, त्यावेळी पहिल्यांदा दोन महत्वाच्या भेटी झाल्यात. त्यातील पहिलं व्यक्तिमत्व म्हणजे मारुती चितमपल्ली आणि दुसरे म्हणजे सारस पक्षी. त्यावेळी सारस चंद्रपूर जिल्ह्यात सुद्धा दिसायचा.

पुढे आम्ही अमरावती जिल्ह्यात ११ व्या विदर्भ पक्षिमित्र संमेलनाचे आयोजन केले त्यावेळी गोंदिया येथून आलेल्या मंडळींनी सारस हा विषय पहिल्यांदा संमेलनात मांडला व अनेकांना हा पक्षी नेमका कसा आहे आणि त्याची सध्यस्थिती कशी आहे याची थोडीफार कल्पना आली. त्यानंतर २०१२ साली २५ वे रौप्यमहोत्सवी महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन मुंबईतील बोरीवली येथे भरले. या संमेलनात श्री. मुकुंद धुर्वे आणि स्व. मुनेश उर्फ ईश्वरदयाल गौतम यांनी सारसची सध्यस्थिती हा विषय अगदी पोटतिडकीने मांडला आणि महाराष्ट्राच्या मंचावरून हा विषय राज्यभरातील पक्षिनिरीक्षक आणि व विभागाच्या अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविला. त्याचा तत्काळ परिणाम होऊन महाराष्ट्र पक्षीमित्र तर्फे सारस संवर्धन निधीची घोषणा करण्यात आली आणि वन विभागाकडून सुद्धा या विषयाची नोंद घेतली गेली. सारस पक्षी अख्ख्या महाराष्ट्रात फक्त राज्याच्या पूर्व भागातील चंद्रपूर, भंडारा व गोंदिया याच जिल्ह्यात आढळतो आणि त्याची संख्या फक्त दोन आकडी उरली आहे हे अनेकांना त्यावेळी समजले.

आमचे सहकारी, मित्र व जेष्ठ पक्षिमित्र श्री मुकुंद धुर्वे यांचे झाडीपट्टीचे वैभव- सारस: या पुस्तकाचे परीक्षण लिहिण्यापूर्वी विदर्भातील सारस पक्षी आणि मी व सारस संवर्धनाचा विषय आणि महाराष्ट्र पक्षीमित्र या दोन्ही बाबतची पार्श्वभूमी या पुस्तकासोबत




निगडीत असल्याने या ठिकाणी मांडली. या पुस्तकाच्या लिखाणा पासून ते प्रकाशनापर्यंत श्री. धुर्वे सरांशी माझी अधूनमधून चर्चा व्हायची. पुस्तक प्रकाशनासाठी मला गोंदिया येथे जाता आले नाही. पुस्तक २०२३ साली प्रकाशित झाले. त्यानंतर तब्बल वर्षभरानंतर, गोंदिया येथे सेवा या संस्थेच्या सारस मित्र संमेलनाच्या निमित्त्याने गोंदिया येथे जाणे झाले आणि धुर्वे सरांनी माझ्यासाठी राखून ठेवलेली माझी प्रत माझ्या सुपूर्द केली. कार्यक्रम आटोपून परतीच्या रेल्वे प्रवासात घरी येण्यापूर्वीच पुस्तक वाचून काढले.

मी वर उल्लेख केलेले स्व. मुनेश उर्फ ईश्वरदयाल गौतम यांनी सारस संवर्धनातील सुरुवातीच्या काळात मुकुंद धुर्वे यांचे सोबत कार्य केले आहे. मात्र २०१९ साली गौतम सरांचे दुर्धर आजाराने निधन झाले होते. या खंद्या कार्यकर्त्यास पुस्तकाच्या सुरुवातीलाच श्रद्धांजली वाहिली आहे.

पुस्तकाच्या सुरुवातीस लेखकाने त्यांचे मनोगत माय लाइफ बर्ड या शीर्षकांतर्गत मांडलेले आहे. आम्ही अमरावती येथे आयोजित केलेल्या १३ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या स्मरणिकेत त्यांचा याच शीर्षकाचा लेख प्रकाशित झाला होता हे मला पुस्तक वाचताना आठवले. मनोगत लिहिताना त्यांनी लहानपणापासूनच्या सारस बघण्याच्या आठवणी पासून सुरुवात केली आणि पुढे सारस

संवर्धन कार्यास कशी सुरुवात झाली असा संपूर्ण प्रवास मांडला. या पुस्तकास जेष्ठ वन्यजीव अभ्यासक श्री. किशोर रिठे आणि जेष्ठ पक्षीतज्ञ डॉ. अनिल पिंपळापुरे यांची प्रस्तावना लाभली आहे.

पुस्तकाचे शीर्षक, झाडीपट्टीचे वैभव- सारस, आहे, झाडीपट्टी म्हणजे काय ? हे अनेकांना कदाचित कळले नसेल. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा हा वनांनी समृद्ध असा प्रदेश आहे. भंडारा जिल्हा हा तलावांचा जिल्हा म्हणून परिचित आहे. तर या संपूर्ण भागात असलेल्या वनांमुळे या प्रदेशाची पूर्वापार ओळख गोंडवाना अशी आहे. मात्र स्थानिक लोक त्यांच्या प्रदेशास, झाडीपट्टी असे संबोधतात. तर अशा या गडचिरोली आणि भंडारा जिल्ह्याच्या मध्ये आहे तो नव्याने निर्माण झालेला गोंदिया जिल्हा. नोकरीच्या निमित्याने लेखकाचे संपूर्ण आयुष्य गोंदिया जिल्ह्यात गेले, तेथेच ते स्थायिक सुद्धा आहेत. आणि आज महाराष्ट्रात सारस शेवटचा उरला आहे तो फक्त गोंदिया जिल्ह्यातच. यामुळे लेखकाने गेल्या अनेक वर्षापासून एकाच पक्ष्याच्या अभ्यासासाठी व त्याच्या संवर्धनासाठी कार्य केले त्यामुळे त्यांच्या संपूर्ण लिखाणात सारस पक्ष्यासोबत त्यांच्या भावना जुळलेल्या आहेत असे जाणवत राहते. म्हणूनच सारस त्यांचा लाइफ बर्ड झाला आहे.

या संपूर्ण पुस्तकात एकूण सात प्रकरणे व शेवटचे परिशिष्ट अशी आठ प्रकरणे असून पहिल्याच प्रकरणात त्यांनी सारस पक्ष्याचे पुराणातील उल्लेख, प्राचीन वाड:मयातील दाखले देऊन सारस समजून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. दुसरे प्रकरण आहे ते सारसाचा शोध. या प्रकरणात सारस लाइफ बर्ड झाल्यावर त्यांनी गोंदिया व भंडारा जिल्ह्यात या पक्ष्याचा घेतलेला शोध, त्यासाठी घेतलेले परिश्रम व ग्रामस्थांना त्यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी व संवर्धनासाठी वापरलेल्या क्लुप्त्या व प्रयत्न याचा आढावा घेतलेला आहे. तिसरे प्रकरण हे सरसाचे वर्णन असे असले तरी सुरुवातीला सारस दिसतो कसा, त्याची वैशिष्ट इत्यादी मांडले असले तरी या प्रकरणात पुन्हा सारस पक्ष्याचा शोध, त्याच्या वेगवेगळ्या गोष्टी व अनुभव, यातून नवीन ठिकाणांचा शोध व हे सारे खटाटोप सुरु असताना व अधिकारी व इतर मान्यवर व अभ्यासकांनी या कामाची घेतलेली दखल आदी गोष्टी सुद्धा याच प्रकरणात आल्या आहेत. त्यातून पुढे गोंदिया निसर्ग मित्र मंडळाची स्थापना कशी झाली हे सुद्धा सांगितले आहे. विषबाधा होऊन झालेले सारसाचे मृत्यू व घरटे संवर्धनासाठी केलेले प्रयत्न अशा काही घटना सुद्धा वाचायला मिळतात. मुकुंद धुर्वे व त्यांच्या सहकाऱ्यांची २००३ पासून सुरु झालेले सारस निरीक्षण, सारस अभ्यास, सारस शोध मोहीम व गणना अशा टप्प्यात पुढे सरकत गेलेली ही मोहीम आज संवर्धनासाठी उभी राहिलेली एक चळवळ बनली. यामध्ये आज अनेक जण सहभागी झाले असून यामध्ये स्थानिक शासन, प्रशासन, वन विभाग, सेवा ही तरुण अभ्यासकांची संस्था व सबंधित ग्रामस्थ यांचा समावेश आहे. सारस पक्ष्यांसाठी गावोगाव भटकताना ही मंडळी सारसवाले कसे झाले हे सर्व आपल्याला पुढील काही प्रकरणा मध्ये वाचायला मिळेल.

महाराष्ट्राच्या गोंदिया जिल्ह्यात आढळणारा सारस ही भारतातील दक्षिणेकडील शेवटची सीमा (Southernmost limit) असून या सीमेच्या खाली भारतात कुठेही सारस आढळत नाही. दुर्दैवाची गोष्ट अशी की इतर वन्यजीवांचे अधिवास जसे आकुंचित पावत आहेत तीच परिस्थिती सारस पक्ष्याची आहे. त्यामुळे या ठिकाणी असलेला सारस संपला तर महाराष्ट्रातील एक प्रजाती आणखी एकाने कमी होईल शिवाय ही दक्षिण सीमा आणखी वर सरकेल. सारस विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत आढळतो, त्याला राहायला, घरटे करायला, खाद्य शोधायला उथळ पाण्याची ठिकाणे लागतात. अशी परिस्थिती, तलावांचे व भात शेती साठी प्रसिद्ध असलेले भंडारा व गोंदिया या जिल्ह्यात आहे. या ठिकाणी तो घरटे कसे करतो, घरटे कसे असते अंडी घातल्यानंतर त्यांची वागणूक कशी असते, पिल्लू किती दिवसात बाहेर येते. या काळात त्यांचे खाद्य काय आहे, त्यांना कुठले धोके असतात, अशी सर्व माहिती काही निरीक्षणे या प्रकरणात वाचयला मिळतात. सारस आणि वास्तव या प्रकरणात सुद्धा सारस बद्दल अशीच महत्त्वाची व रंजक माहिती दिलेली असून या प्रकरणाच्या मध्ये दोन रंगीत पानांवर जगभरात आढळणाऱ्या १५ जातीच्या सारस पक्ष्यांची माहिती त्यांच्या रंगीत छायाचित्र सहित दिलेली आहे. एकूणच काय तर हे पुस्तक म्हणजे महाराष्ट्रात एका छोटयाशा भागात अवघ्या ३५-४० च्या संख्येत उरलेल्या, उडणाऱ्या पक्ष्यांपैकी सर्वात मोठा व दिसण्यास राजबिंडा अशा सारस पक्ष्याची नुसतीच सुरस कहाणी नाही तर, लेखकाचे अनुभव व त्यांच्या २० वर्षाच्या प्रवासात सारस पक्ष्यांच्या अधिवासाची झालेली वाताहत, कमी होत चाललेली

संख्या व सर्वात विदारक म्हणजे घरट्यांची कमी होत असलेली संख्या म्हणजे क्षीण होत चाललेला आशेचा किरण. अशी सर्व गाथा व कथा या पुस्तकातून मांडली आहे. नागपूर येथील प्रसिद्ध अशा साहित्य प्रसार केंद्र या प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले असून ९८ इतकी पृष्ठ संख्या असलेल्या या पुस्तकाची किंमत १५०/- रुपये इतकी आहे. विशेष म्हणजे या पुस्तकाच्या मुखपृष्ठवर असलेले सारस पक्ष्याचे पिसे साफ करतानाचे जे रंगीत स्केच आहे ते स्वतः लेखकाने काढलेले आहे. ते स्वतः बॅचलर ऑफ फाईन आर्ट (BFA) या शाखेचे पदवीधर असून त्यांनी कला शिक्षक म्हणून नोकरी केली आहे. पुस्तकाच्या आतमध्ये दोन पूर्ण पानभर सारसाचे गोंडी आर्ट मधील आकर्षक अशी रंगीत चित्रे रेखाटलेली असून , त्यामध्ये एका पानावर सारसची जोडी तर दुसऱ्या चित्रात सारस पक्ष्यांसह त्यांचा अधिवास चितारलेला आहे. या शिवाय या पुस्तका मध्ये सारस पक्ष्यांचे कृष्णधवल रेखाटणे दिसतात. ही सर्व चित्रे व रेखाटणे स्वतः लेखक श्री मुकुंद धुर्वे यांनीच काढलेली आहेत. या चित्रांमुळे पुस्तक अधिकच आकर्षक झाले आहे यात शंकाच नाही.

**डॉ. जयंत वडतकर**

अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र

jayantwadatkar.wecs@gmail.com

9822875773

## प्रपत्र : IV

| | | | |
|---|---|---|---|
| १) | **प्रकाशन स्थळ** | : | महाराष्ट्र पक्षीमित्र, ६३, अरण्यार्पण, समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती. महाराष्ट्र. पीन कोड नं. : पीन : ४४४६०४. |
| २) | **प्रकाशन कालावधी** | : | त्रैमासिक |
| ३) | **मुद्रक** | : | श्री. जगदिश डी. सुकलकर (ज्ञानपथ प्रिंटर्स आणी ग्राफिक्स) पत्ता : वि.एम.वी.रोड, अमरावती. |
| ४) | **प्रकाशक** | : | डॉ. जयंत वडतकर (अध्यक्ष), महाराष्ट्र पक्षीमित्र |
| | **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| | **पत्ता** | : | ४२, ग्रीन पार्क कॉलनी, आशियाडजवळ, शेगाव रोड, अमरावती. पीन : ४४४६०४. |
| ५) | **संपादक** | : | श्री. दिगंबर गाडगीळ |
| | **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| | **पत्ता** | : | C/o यशवंत पटवर्धन ४४/३० रूबी । शिवदर्शन पर्वती, । शतायू भवन शेजारी राज अपार्टमेंट, पुणे ९ |

मी, जयंत सुधाकरराव वडतकर जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीनुसार बरोबर व खरी आहे.

दिनांक : १ एप्रिल २०२४

सही/-

**जयंत सुधाकरराव वडतकर**

अध्यक्ष महाराष्ट्र पक्षीमित्र

# टपाल तिकिटांच्या दुनियेत

# टकाचोर

## Rufous Treepie (Dendrocitta vagabunda)



**रवींद्र वामनाचार्य**
नाशिक
मोबाईल नं. : ९८९०३९०५२७
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

टकाचोर हा कावळयाच्या कुळातील पक्षी आहे, साळुंकीपेक्षा मोठ्या आकाराचा हा पक्षी आहे व त्याची शेपटी बरीच लांब ३० सें. मी इतकी असते. त्याचा रंग चेस्टनट तपकिरी असतो आणि त्याची मान, छाती, कंठ व डोके यांचा रंग काळसर राखी असतो. चोच काळी असून चोचीचा आकार कावळया सारखा असतो. उडणाऱ्या दोन्ही पंखात राखी व काळा पटटा असतो. शेपटी राखी काळी असते. जंगलात शिकार झाल्यावर शिकाऱ्याला चुकवून हा पक्षी आपला हिस्सा पळवून नेतो, यावरून यास 'टकाचोर' असे नाव पडले असावे.

टकाचोर हा पक्षी भारतात सर्वत्र विरळ जंगलामध्ये तसेच टेकडयांच्या पायथ्याला माळरानात आढळतो. त्याचप्रमाणे बांगला देश, पाकिस्तान, ब्रम्हदेश याठिकाणी सुद्धा याचे वास्तव्य असते. टकाचोर पक्ष्याचे लहान थवे दाट झाडीत दिसतात. वेगाने एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडताना आपल्या संघनायकाच्या मागे ओळीने जातात. प्रथम हळू हळू पंख हलवतात. शेपटी व पंख ताठ करून हवेत तरंगत जातात. केऽ केऽऽ के ऽऽ असा कर्कश आवाजात ओरडून गोंधळ घालतात. परंतू माद्यांना साद घालतांना मंजूळ साद घालतात.

टकाचोर हे पक्षी इतर फलाहारी पक्ष्यांसोबत झुंडीने वड-पिंपळ, उंबर व इतर झाडांची फळे खातात. कावळयाप्रमाणे वाटेल ते म्हणजे शिळे मांस, कीटक, सरडे, सुरवंट, आळया यांना खातात. हा पक्षी धीट असल्याने त्याला खाण्यासाठी आपल्या हातावर काही खाद्य ढेवल्यास ते हातावर येऊन खाद्याचा समाचार घेतात. फेब्रुवारी ते




जुलैपर्यंत त्यांचा विणीचा हंगाम असतो. उंच झाडाच्या पालवीत काटेरी काटक्यांचे ओबड धोबड घरटे असते त्यात पिसे व मऊ पानांचे व डहाळयांचे अस्तर असते. मादी चार - पाच अंडी घालते. अंडी पांढऱ्या रंगाची असतात व त्यावर तांबूस डाग असतात.

# CIBA

Central India Bird Academy

## OUR MISSION

To encourage interest in birds and promote conservation of birds' habitats through research, education and awareness.

## WE FOCUS ON

- Avian Ecology
- Ethno-Ornithology
- Nature Education
- Conservation Ecology
- Applied Ornithology

## Proposed Activities and Projects

- To conduct Lectures, talks, thematic workshop and seminars on birds.
- To identify status of birds and their habitats in urban landscape.
- To award fellowships to field Ornithologists / Researchers

- **For More Details Contact :**

**The Director**

Central India Bird Academy (CIBA)

Q-12, Siddhivinayak Apartments, Near Jain Mandir, Laxminagar

Nagpur-440022 Maharashtra (india)

Email : ciba.nagpur@gmail.com

**0721-2223022**

**9881713466, 9922964316, 9421189333**



# 'पक्षी येती अंगणी'ला राज्य पुरस्कार प्रदान



पक्षिमित्र या त्रैमासिक अंकात नियमितपणे लेख लिहिणारे पक्षी अभ्यासक, लेखक माणिक पुरी यांना 'पक्षी येती अंगणी' या साहित्य कृतीसाठी राज्य शासनाचा 'श्री. ना. पेंडसे पुरस्कार' मिळाला.

यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार या योजनेंतर्गत प्रथम प्रकाशन विभागातील कादंबरी या वाङ्मय प्रकारासाठी मिळतो. शिक्षणमंत्री दीपक केसरकर, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, भीमराव पांचाळे आदींच्या हस्ते माणिक पुरी, अनुराधा पुरी यांचा यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबईत मराठी भाषा गौरवदिनी सत्कार केला. माळरान, अभयारण्यातील पक्ष्यांची अभ्यासात्मक मांडणी, पक्षी येती अंगणी या कादंबरीचे लेखक माणिक पुरी हे जि. प. प्राथमिक शाळा, रामेटाकळी येथे शिक्षक आहे.




पक्षीमित्र संमेलन, कथालेखन कार्यशाळा, पक्षी सप्ताह, वन्यजीवन सप्ताह यामध्ये त्यांचा सहभाग राहिला आहे.

Book Post

प्रती,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षीमित्र
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : ज्ञानपथ प्रकाशन
मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन